**बार्शी येथील ५वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, ता.बार्शी, जि. सोलापूर यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी दावा क्र. ४९७/२०१७**

अर्जुन दत्तू धुमाळ ..... वादी

विरुध्द

धनाजी विष्णू धुमाळ आणि ईतर ..... प्रतिवादी

**निशाणी क्र.५ वरील आदेश**

१. सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ३९ नियम १ अन्वये तात्पुरती मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन -**

२. डि सोलापूर, सब डि बार्शी, तालुका बार्शी पैकी मौजे तुर्कपिंपरी, ता. बार्शी येथील मिळकत गट नं. २६०/८/ब, क्षेत्र १हे.५९आर.,सदर मिळकतीचे चतुःसिमा खालीलप्रमाणे आहेत.

पुर्वेस – रस्ता, दक्षिणेस – उदय धुमाळ गट नं. २६०/८/अ, पश्चिमेस – गट नं. २५० व उत्तरेस – गट नं. २६०/७ सोमनाथ थोरात अशी आहे.

(सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधले जाईल.)

**वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–**

३. दावा मिळकत ही वादीचे मालकीची असून त्यांचे कब्जेवहिवाटीत आहे. वादी हे दावा मिळकतीतच रहात आहेत. वादी पुढे असे कथन करतात की, प्रतिवादी यांनी संगनमताने वादीच्या जमिनीमध्ये अतिक्रमण करण्याच्या उद्देशाने दावा मिळकतीच्या कागदोपत्री बेकादेशीरपणे नाव लावण्याचा व वादीला दावा जमिनीतून हुसकावून देण्याचा प्रयत्न सुरु केला. दिनांक ०५/०६/२०१७ रोजी प्रतिवादीनी दावा जमिनीमध्ये पाईपलाईन फोडून चिंच, आंबा व जांभुळ या झाडाच्या फांदया तोडल्या. प्रतिवादी हे दावा मिळकतीत अनाधिराने घुसून वारंवार वादीस वकिलामार्फत नोटीस पाठवून वादीच्या दावा मिळकतीत असलेल्या शांबतरतामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे वादीला योग्य त–हेने दावा मिळकतीची मशागत करणे शक्य होत नाही. सदर बाबत वादीने वारंवार वैराग पोलिस स्टेशन, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर व पोलिस अधिक्षक सोलापूर ग्रामीण यांच्याकडे तक्रारी दिले आहेत. प्रतिवादींच्या हरकती अशाच चालू राहिल्यास वादीला त्याचे जमिनीत

उपभोग घेता येणार नाही. सबब वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये व दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करु नये अशा तात्पुरत्या अशा तुर्तातुर्त ताकिदीसाठी केला आहे.

**<u>प्रतिवादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–</u>**

४. प्रस्तुत अर्जावरती प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियत व म्हणणे नि.क्र. १६ वर दाखल केले आहे व प्रस्तुत अर्जास हरकत नोंदविली आहे. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, वादीच्या अर्जामधील सर्व कथने खोटी आहेत. वादी हे वारंवार प्रतिवादीविरुद्ध खोटया तक्रारी करीत आहेत. प्रतिवादी क्र. ७ ची गट नं. २६०/७ या जमिनीमध्ये लिंबोणीची बाग आहे. सदर वादी हा प्रतिवादी क्र. ७ च्या क्षेत्रामध्ये हरकत अडथळा करीत आहे व त्या संदर्भात प्रतिवादी क्र. ७ ने रे.मु.नं. ४५१/२०१७ हा दावा दाखल केला आहे. प्रतिवादींनी कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य करुन वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करण्याचा प्रयत्न केला नाही. सबब प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. वादी व प्रतिवादी यांचे वादपत्राचे व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

६. वादातील मुद्दे व त्यावरील निष्कर्ष हे त्यापुढे दर्शविल्याप्रमाणे कारणमिमांसेसह नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही. |
| २) | वादी हे सिध्द करतात काय की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे ? | नाही. |
| ३) | वादी हे सिध्द करतात काय की, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे ? | नाही. |
| ४) | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिता**

७. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी, प्रतिवादी क्र. १ व २ यांचे विरुद्ध तात्पुरत्या मनाई आदेशाची मागणी करीत आहे. सदर अर्ज मंजूर होण्याकरीता वादीस सदर प्रकरणामध्ये प्रथमदर्शनी केस आहे हे शाबीत करणे जरुरीचे आहे. त्याकरीता वादीस दावा मिळकतीमध्ये त्याचा हक्क आहे व प्रतिवादी क्र. १ व २ त्यास हरकत अडथळा करीत आहे ही बाब शाबीत करणे जरुरीचे आहे. वादीचे विधींज्ञाचा युक्तीवाद व वाद कथनांच्या अनुषंगाने दाखल कागदपत्रांचे अवलोकन करणे जरुरीचे आहे. वादीने कागदोपत्री पुराव्यादाखल नि.क्र. ४ खाली वादीचे वडिल मयत दत्तू धुमाळ यांचे नावचे दिनांक ०३/०४/१९७० चे खरेदीखताची छायांकित प्रत, मौजे तुर्कपिंपरी, ता. बार्शी येथील गट नं. २६०/८ब चा सात–बारा उतारा, वादीने प्रतिवादी विरुद्ध वैराग पोलिस ठाणे येथे दिनांक ०५/०५/२०१७, १६/०५/२०१७, २५/०१/२०१७ रोजी तक्रारी अर्ज सहीशिक्कयानिशी, वादीने पोलिस अधिक्षक, सोलापूर यांचे कडे आरपीएडी ने केलेली प्रतिवादी विरुद्धची तक्रार, विधीज्ञ श्री. विकास जाधव यांची नोटीस, वादीने पोलिस अधिक्षक, सोलापूर यांचेकडे दिलेली तक्रार, वादीने जिल्हाधिकारी यांचेकडे दिलेली तक्रार, विधीज्ञ श्री. रणजित काजळे यांची नोटीस पोच, जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे दिलेली प्रतिवादीचे विरुद्ध सही शिक्कयाची पोच तक्रार,मौजे तुर्कपिंपरी, ता. बार्शी येथील गट नं. २६०/८/ब च्या सात–बारा उता–याची सही शिक्कयाची प्रत ईत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

८. वादीचे विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीने प्रथमदर्शनी केस असल्याचे व न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने असल्याचे सिद्ध केले आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल. त्यामुळे सदर अर्ज मंजूर व्हावा असा युक्तीवाद केला. याउलट प्रतिवादीचे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादीने हे सिद्ध केले नाही की, प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये हरकत अडथळा करीत आहेत. वादीने हे दाखविले नाही की, हरकत अडथळा हे नेमके कोणते प्रतिवादी करीत आहेत. वादीने प्रथमदर्शनी केस सिद्ध केली नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर व्हावा असा युक्तीवाद त्यांनी केला.

९. वादीचे विधींज्ञाचा युक्तीवाद व वादीने दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादीने त्याचे कथनाचे पुष्टयर्थ कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत. दावा मिळकत गट

क्र. २६०/८ब च्या सात–बाराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर उता–यावर भोगवटदार म्हणून वादी यांचे नाव नमूद केले आहे. नि.क्र. १६ वर असलेले प्रतिवादींचे म्हणणे याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये वादीची कब्जेवहिवाट आहे याबाबत वाद उपस्थित केला नाही. यावरुन असे दिसून येते की, वादी हे दावा मिळकती मध्ये वहिवाट करीत आहेत ही बाब प्रतिवादी यांना मान्य आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीचा दावा मिळकतीमध्ये ताबा असल्याबाबत वाद उपस्थित झालेला नाही.

१०. वादीने प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ शपथपत्र नि.क्र. ६ वर दाखल केले आहे व त्यामध्ये अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. सदर शपथपत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, प्रतिवादी हे वादी यांच्या दावा मिळकतीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. वादीने अर्जामध्ये केलेले कथन की, प्रतिवादी दावा जमिनीमध्ये अनाधिकृतपणे येवून वादीला दावा जमिनीतून हुसकावून लावण्याची भाषा करीत होते. तसेच दिनांक ०५/०६/२०१७ रोजी प्रतिवादी यांनी वादीच्या कब्जेतील पाईपलाईन फोडून चिंच, आंबा व जांभुळ या झाडांच्या फांदया तोडल्या व निघून गेले. वादींनी त्यांना अडवले असता त्यांनी वादीला मारहाण व शिवीगाळ केली. सदर बाबत वादीने प्रतिवादी यांच्या विरुद्ध वैराग पोलिस स्टेशन येथे दिनांक २५/०१/२०१७, ०५/०५/२०१७ व १६/०६/२०१७ तसेच जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे ०८/०६/२०१७ व पोलिस अधिक्षक, सोलापूर ०६/०६/२०१७ रोजी तक्रारी अर्ज दाखल केले आहेत. सदर तक्रारी अर्जांची स्थळप्रती वादीने अभिलेखावर दाखल केल्या आहेत.

११. दिनांक २५/०१/२०१७ रोजीच्या तक्रारी अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिनांक २४/०१/२०१७ रोजी प्रतिवादीने दावा जमिनीमध्ये ट्रॅक्टर आणून पिकांचे नुकसान करण्याचा प्रयत्न केला. परंतु सदरची बाब वादीने प्रस्तुत अर्जामध्ये अथवा शपथपत्रामध्ये नमूद केली नाही. तसेच दिनांक १६/०५/२०१७ रोजीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदर अर्जामध्ये प्रतिवादी विरुद्ध त्यांच्या पत्नीचे गळयातील मणीमंगळसूत्र हिसकावून घेवून गेल्याचा व तिला मारहाण केल्याचा आरोप केला आहे. सदर आरोप हे गंभीर असून देखील प्रतिवादींनी त्याचा प्रस्तुत अर्जामध्ये त्याचा उल्लेख केलेला नाही. तसेच पोलिसांनी सदर बाबत दखल न घेतल्यानंतरही वादीनी त्याबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई केल्याचे आढळून येत नाही. तसेच वादीने प्रतिवादी यांना दिनांक

२४/०५/२०१७ रोजी त्यांचे विधीज्ञांमार्फत नोटीस पाठवून वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा होईल असे कृत्य न करण्याची विनंती केली. सदर नोटीसची स्थळप्रत व पोहोच पावती वादीने अभिलेखावर दाखल केली आहे. प्रस्तुत अर्जातील शपथपत्रातील व सर्व तक्रारी अर्जातील मजकुरामध्ये तफावत आढळून येते.

१२. वादीने त्यांच्या म्हणण्याच्या पुष्ठयर्थ खालील न्यायनिर्णय दाखल केले आहेत.

अ) ***गुरुनाथ रेडकर वि. बाळकृष्ण रेडकर, 2012 BCI 883***,

ब) ***हनुमानप्रसाद गुप्ता वि. जग्याभान गुप्ता, AIR 2004 MP 244***,

क) **बितोला कौर वि. राम चरण, 1978 CJ(All) 1983**,

मी वर नमूद सर्व न्यायनिवाडयांचे अवलोकन केले आहे. सदर न्यायनिर्णयांच्या अवलोकनावरुन असे दिसून येते की, प्रस्तुत अर्जाच्या वस्तुस्थितीमध्ये हे न्यायनिर्णय उपयोगाचे ठरणार नाहीत.

१३. यासर्व कागदपत्रांवरुन वादी हे दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीत असल्याचे वादी प्रथमदर्शनी सिद्ध करतात. परंतु दावा जमिनीमध्ये होत असलेल्या अतिक्रमणाबाबत वादीने प्रतिवादीस पाठविलेली नोटीस, तक्रारी अर्ज, प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ दाखल केलेले शपथपत्र या सर्वांमधील अभिकथना व्यतिरिक्त ईतर कोणताही पुरावा वादीने समोर आणला नाही. दावा जमिनीमध्ये बांधकाम करण्याकरीता वादीने खांदलेले खड्डे प्रतिवादींनी बुजविले असा आरोप तक्रारी अर्जामध्ये केला असला तरी प्रस्तुत अर्जामध्ये त्याचा उल्लेख नाही. प्रतिवादींनी दावा जमिनीतील पाईपलाईन फोडून झाडांच्या फांदया तोडल्या हे दाखविण्याकरीता तोंडी आरोपा व्यतिरिक्त वादीने ईतर कोणतेही पुरावे दाखल केले नाहीत. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीने त्याच्या म्हणण्याच्या पुष्ठयर्थ कोणतेही छायाचित्रे दाखल केली नाहीत. प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासून आजतगायत प्रतिवादींचे दावा जमिनीत हरकत अडथळा करण्याचे कृत्य चालू आहे किंवा कसे हे दाखविण्यासाठी वादीने अभिलेखावर काही आणले नाही अथवा तोंडी युक्तीवादामध्ये प्रतिवादी अजूनही हरकत अडथळा करीत आहेत असे म्हटले नाही. या सर्वांवरुन वादी हा दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीत आहे हे दिसून येत असले तरीही प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये हरकत अडथळा करीत आहे ही बाब प्रथमदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे सदर परिस्थितीमध्ये वादीस त्याचे बाजूने प्रथमदर्शनी केस असल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ व ३ करिता–</u>**

१४. वादीचे विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, वादी दावा मिळकतीचा मालक व वहिवाटदार असून प्रतिवादी हे त्यास हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे वादीचे कायदेशीर हक्कांवर गदा येवून वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होत आहे. या अनुषंगाने हे नमूद करणे जरुरीचे की, वादीने त्यास प्रथमदर्शनी केस आहे ही बाब दर्शविली नाही. तसेच सद्यस्थितीत अभिलेखावरुन दावा मिळकत वादीचे कब्जेवहिवाटीत आहे असे दिसून येते. अशा परिस्थितीत निश्चितच प्रतिवादी यांनी वादीचे दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण केलयास वादीच्या हक्कांचे उल्लंघन होणार असून वादीस दावा मिळकतीमध्ये शांततापूर्वक वहिवाट करता येणार नाही. परंतु वादी हे सिद्ध करु शकले नाही की, प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करुन वादीच्या शांततामय वहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. अशा परिस्थितीत न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने झुकत आहे किंवा नाही आणि वादीस अपरिमित नुकसान होणार आहे हे वादी सिद्ध करु शकलेले नाहीत. सद्यस्थितीला वादीने मनाई आदेश पारित न केल्यास त्याचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार असून न्यायाचा तराजू त्याचे बाजूने झुकत आहे ही बाब सिद्ध केली नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ व ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करिताः</u>**

१५. वरील सर्व परिस्थिती व बाबी, तसेच मुद्दयांवरील निष्कर्ष व त्यावरील कारणमिमांसा व दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ मधील तरतुदी ध्यानात घेता प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. त्याप्रमाणे मुद्दा क्र.४ च्या उत्तरार्थी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १ | वादीचा अर्ज नि.क्र.५ तात्पुरत्या मनाईचा अर्ज नामंजूर करण्यात आला. |
| २ | पक्षकारांनी आपआपले खर्च सोसावेत. |

(खुल्या न्यायालयात अधिघोषित)

सही/–

(श्रीमती रेवती पी. बागडे )

दिनांक २६/०६/२०२५ ५वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बार्शी

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.V. Kokate (Grade III) |
| (b) | Court | : | Smt. R.P. Bagade<br>4th Jt. Civil Judge,<br>J.D.& J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 26/06/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 30/06/2025. |